दिनांक - 25/01/2024 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.228

विषय :- केंद्र शासन पुरस्कृत अमृत 2.0 योजनेअंतर्गत विटा शहर सुधारित पाणी पुरवठा योजनेच्या प्रकल्प अहवालास मंजूरी देणेकामी निर्णय घेणे.

संदर्भ :- 1) मा.मुख्याधिकारी यांनी पा.पु.ज.नि.व स्वच्छता अभियंता यांची दिनांक 25/01/2024 रोजी मंजूर केलेली टिपणी.

2) मा.कक्ष अधिकारी, नगरविकास विभाग, 4 था मजला, मंत्रालय मुंबई – 400 032 यांचे पत्र क्र. अमृत- 2024/प्र.क्र.35/नवि-33. दि.17/01/2024.

3) जियो स्पेशियल स्टुडिओ,एल.एल.पी.पुणे यांचेकडून आवक क्र.6581 दि.25/01/2024 ने प्राप्त D.P.R.

4) जियो स्पेशियल स्टुडिओ, एल.एल.पी. पुणे यांना जा.क्र.1829 दि.27/09/2023 रोजी दिलेला आदेश.

5) दि.11/07/2023 रोजीचा प्रशासकीय ठराव क्र.35.

मा.प्रधान सचिव, नवि-2 यांच्या अध्यक्षतेखाली केंद्र पुरस्कृत अमृत 2.0 अभियानांतर्गत गठित राज्यस्तरीय तांत्रिक समितीच्या दि.10/01/2024 रोजीच्या बैठकीत विटा नगरपरिषदेचा केंद्र शासन पुरस्कृत अमृत 2.0 योजनेअंतर्गत विटा शहर सुधारित पाणी पुरवठा योजनेच्या र.रु.87,18,36,500/- किंमतीचा प्रकल्प अहवाल सादर करणेत आला होता. मात्र संदर्भ क्र.2 चे पत्रान्वये सदर प्रकल्पाची किंमत ही केंद्र शासनाच्या शिखर समितीने मान्यता दिलेल्या किंमतीपेक्षा अधिक असल्याचे समितीने नमूद केले आहे. तसेच सदर प्रकल्पाच्या तांत्रिक मान्यतेचा प्रस्ताव केंद्रशासनाच्या शिखर समितीने मान्यता दिलेल्या रकमेच्या मर्यादेत फेरसादर करावा अन्यथा सदर प्रकल्प महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत प्रस्तावित करण्याची समितीने दिलेल्या सूचनेवरुन संदर्भ क्र.3 नुसार विटा नगरपरिषदेने संदर्भ क्र.4 ने दिलेल्या आदेशाप्रमाणे जियो स्पेशियल स्टुडिओ, एल.एल.पी. पुणे यांनी रक्कम रू. 22,23,94,600/- मात्र किंमतीचे प्रकल्प अहवाल, अंदाजपत्रके व नकाशे सादर केलेले आहेत. सदर प्रकल्प अहवाल तांत्रिक मान्यता मिळणे कामी मा.मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पुणे या कार्यालयाकडे सादर करणेत यावा. याकामी होणारी तांत्रिक मान्यता फि महाराष्ट्र जीवन प्राधिकरण या कार्यालयास आदा करणेत यावी. तसेच तांत्रिक मान्यता मिळालेनंतर केंद्र शासन पुरस्कृत अमृत 2.0 योजनेअंतर्गत सदरचा प्रस्ताव शासनाकडे सादर करणेस मंजुरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-

( डॉ.विक्रम बांदल )

प्रशासक

विटा नगरपरिषद विटा

दिनांक - 25/01/2024 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.229

विषय :- महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत विटा शहर सुधारित पाणी पुरवठा योजनेच्या प्रकल्प अहवालास मंजूरी देणेकामी निर्णय घेणे.

संदर्भ :- 1) मा.मुख्याधिकारी यांनी पा.पु.ज.नि.व स्वच्छता अभियंता यांची दिनांक 25/01/2024 रोजी मंजूर केलेली टिपणी.

2) मा.कक्ष अधिकारी, नगरविकास विभाग, 4 था मजला, मंत्रालय मुंबई – 400 032 यांचे पत्र क्र. अमृत- 2024/प्र.क्र.35/नवि-33. दि.17/01/2024.

3) जियो स्पेशियल स्टुडिओ,एल.एल.पी.पुणे यांचेकडून आवक क्र.6580 दि.25/01/2024 ने प्राप्तD.P.R.

4) जियो स्पेशियल स्टुडिओ, एल.एल.पी. पुणे यांना जा.क्र.1829 दि.27/09/2023 रोजी दिलेला आदेश.

5) दि.11/07/2023 रोजीचा प्रशासकीय ठराव क्र.35.

मा.प्रधान सचिव, नवि-2 यांच्या अध्यक्षतेखाली केंद्र पुरस्कृत अमृत 2.0 अभियानांतर्गत गठित राज्यस्तरीय तांत्रिक समितीच्या दि.10/01/2024 रोजीच्या बैठकीत विटा नगरपरिषदेचा केंद्र शासन पुरस्कृत अमृत 2.0 योजनेअंतर्गत विटा शहर सुधारित पाणी पुरवठा योजनेच्या र.रु.87,18,36,500/- किंमतीचा प्रकल्प अहवाल सादर करणेत आला होता. मात्र संदर्भ क्र.2 चे पत्रान्वये सदर प्रकल्पाची किंमत ही केंद्र शासनाच्या शिखर समितीने मान्यता दिलेल्या किंमतीपेक्षा अधिक असल्याचे समितीने नमूद केले आहे. तसेच सदर प्रकल्पाच्या तांत्रिक मान्यतेचा प्रस्ताव केंद्रशासनाच्या शिखर समितीने मान्यता दिलेल्या रकमेच्या मर्यादेत फेरसादर करावा अन्यथा सदर प्रकल्प महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत प्रस्तावित करण्याची समितीने दिलेल्या सूचनेवरुन संदर्भ क्र.3 नुसार विटा नगरपरिषदेने संदर्भ क्र.4 ने दिलेल्या आदेशाप्रमाणे जियो स्पेशियल स्टुडिओ, एल.एल.पी. पुणे यांनी रक्कम रू. 64,94,41,900/- मात्र किंमतीचे प्रकल्प अहवाल, अंदाजपत्रके व नकाशे सादर केलेले आहेत. सदर प्रकल्प अहवाल तांत्रिक मान्यता मिळणे कामी मा.मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पुणे या कार्यालयाकडे सादर करणेत यावा. याकामी होणारी तांत्रिक मान्यता फि महाराष्ट्र जीवन प्राधिकरण या कार्यालयास आदा करणेत यावी. तसेच तांत्रिक मान्यता मिळालेनंतर महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत सदरचा प्रस्ताव शासनाकडे सादर करणेस मंजुरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा